साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

* परळी वैजनाथ * बुधवार, दि. २६ मार्च २०२५ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## परळी तालुक्यातील ९० ग्रामपंचायतींच्या सरपंचपदांचे आरक्षण जाहीर

परळी वैजनाथ, (बातमीदार):- तालुक्यातील ९० ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाची आरक्षण सोडत प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पडली. येथील तहसील कार्यालयात परळीचे उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर व तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्या उपस्थितीत २५ मार्च रोजी बैठकीत शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते आरक्षण सोडत काढण्यात आली. यावेळी अनेक गावचे सरपंच, उपसरपंच उपस्थित होते.



**खुला प्रवर्ग:-** पोहनेर, कावळ्याचीवाडी, बोधेगाव, वाका, परचुंडी, नागापूर, कन्हेरवाडी, ममदापूर, आचार्य टाकळी, रेवली, वानटाकळी, लोणारवाडी, इंदपवाडी, डाबी, लोणी, वडगाव दा., खोडवा सावरगाव, हाळंब, नागदरा, जयगाव, माळहिवरा, मांडेखेल, वागबेट, जिरेवाडी, मांडवा प.

**खुला प्रवर्ग महिला-** तेलसमुख, बोरखेड, रामेवाडी का., हिवरा गो., सिरसाळा, गडदेवाडी, तडोळी, दौनापूर, मिरवट, चांदापूर, नंदागौळ, जळगव्हाण, भिलेगाव, वडखेल, आस्वलंबा, भोपला, मरळवाडी, हेळंब, दैठणा घाट, गोवर्धन हिवरा, पांगरी, नागपिंप्री, टोकवाडी, सारडगाव, मालेवाडी

**अनुसूचित जाती:-** लमाणतांडा प., करेवाडी, टाकळी देशमुख, खामगाव, डिग्रस, मोहा, दौंडवाडी

**अनुसुचित जाती महिला:-** वानटाकळी तांडा, सरफराजपूर, पाडोळी, भोजनकवाडी, ब्रह्मवाडी, नाथ्रा, सेलू स., वाघाळा प.

**अनुसूचित जमाती महिला:-** दाऊतपूर,

**नागरिकांचा मागास प्रवर्ग:-** कौडगाव हुडा, कौडगाव सा., कौठळी, लिंबुटा, सेलू प, नंदनज, लेंडेवाडी, मैंदवाडी, वंजारवाडी, कासारवाडी प., गुटेवाडी, मलनाथपूर

**नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला:-** पिंप्री बु, औरंगपूर, कौडगाव घोडा, इंजेगाव, सोनहिवरा, तळेगाव प., बेलंबा, लाडझरी, धर्मापुरी, पिंपळगाव गाढे, संगम, तपोवन. ***

## उष्माघाताचा धोका पाहता पहिली ते नववीच्या परीक्षा १५ एप्रिलच्या आत घ्याव्यात-धनंजय कुलकर्णी

बीड (बातमीदार):- महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने संबंध महाराष्ट्रात उसळलेली उष्णतेची लाट लक्षात घेता उष्माघाताचा धोका लहान मुले व वृद्धांना होऊ शकतो म्हणून मार्गदर्शक सूचना दि. २१ मार्च रोजी शासन निर्णयाद्वारे निर्गमित केलेल्या आहेत.

मात्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे यांनी महाराष्ट्राची भौगोलिक स्थिती, तापमानातील विविधता, दाहकता, उष्माघात, बालकांच्या आरोग्याचे धोके आणि बालमानसशास्त्र यांचा कोणताही विचार न करता दि.२७ फेब्रुवारी २०२५ रोजी महाराष्ट्र भर इयत्ता पहिली ते नववीच्या वार्षिक, संकलित व पॅट परीक्षा एकाच वेळी म्हणजे ९ एप्रिल ते २५ एप्रिल दरम्यान घेण्याबाबत वेळापत्रक निर्गमित केले आहे.

विशेष म्हणजे इयत्ता पहिली व चौथीच्या परीक्षा अगदी शेवटी म्हणजे दि.२२ एप्रिल ते दि.२५ एप्रिल दरम्यान ठेवलेल्या आहेत. करीता इयत्ता पहिली ते नववीच्या परीक्षा पंधरा एप्रिलच्या आत घेण्यात याव्यात अशी मागणी प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना जिल्हा बीडचे अध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांनी निवेदनाद्वारे केली आहे अशी माहिती जिल्हा संपर्कप्रमुख शहादेव मराठे यांनी दिली आहे.

हा निर्णय स्थानिक ग्रामीण परिस्थिती, वातावरण, तापमान पाणीटंचाई, बाल मानसशास्त्र पाहता अजिबात योग्य नसून ,समस्त बालकांच्या आरोग्याचे प्रश्न निर्माण करणारा व उष्माघाताचा संभाव्य धोक्याची शक्यता वाढवणारा ठरला आहे.

म्हणूनच प्रहार जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांनी आदरणीय मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, आदरणीय शिक्षण मंत्री, ग्रामविकास मंत्री, शिक्षण आयुक्तालय, शिक्षण संचालनालय,पुणे ,एस सी इ आर टी पुणे यांच्या कडे निवेदनाद्वारे इयत्ता पहिली ते नववीच्या परीक्षा एक एप्रिल ते पंधरा एप्रिल दरम्यान घेण्याची आग्रहाची मागणी केली आहे. तसेच या निवेदनात पुढे असे देखील नमुद केले आहे की,शिक्षक व शाळा व्यवस्थापनाला देखील निकाल, गुणपत्रके, उपचारात्मक अध्यापन इत्यादी बाबी साठी उर्वरित कार्यदिन आवश्यक आहेत, असे जिल्हा सरचिटणीस अविनाश काळे यांनी स्पष्ट केले आहे.*

## बीड जिल्हा बांधकाम कामगार संघटनेच्या वतीने इफ्तार पार्टी उत्साहात



परळी वैजनाथ, (बातमीदार):- बीड जिल्हा बांधकाम कामगार संघटना (लाल बावटा) च्या वतिने बांधकाम कामगार संघटनेच्या वतीने २४ मार्च रोजी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. अतिशय उत्साहात ही इफ्तार पार्टी संपन्न झाली.

इफ्तार पार्टीसाठी सर्व बांधकाम कामगारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. बांधकाम कामगारांत बंधुभाव वाढवा यासाठी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. बीड जिल्हा बांधकाम कामगार संघटनेचे अध्यक्ष प्रा. बी.जी खाडे हे मागील चार वर्षापासून इफ्तार पार्टीचे आयोजन करत आहेत.

इफ्तार पार्टीचे यशस्वी आयोजन करण्यासाठी संघटनेचे सरचिटणीस जालिंदर गिरी, शेख जावेद, शेख अजहर, नविद मौजन, प्रकाश वाघमारे, लक्ष्मीबाई कलिंदर यांनी मेहनत घेतली. ***

## परळी पालिकेने नळाला दिवसाआड पाणीपुरवठा करावा-अॅड.मनोज संकाये

परळी वैजनाथ (बातमीदार):- परळी शहरास पाणीपुरवठा करणारे नागापूर येथील वाण धरण यावर्षी अत्यंत समाधानकारक पाऊस झाल्याने भरले. याच धरणातून परळी शहरात पाणीपुरवठा होतो. मात्र नगरपालिकेचे पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक ऐन उन्हाळ्यात कोलमडल्याने सध्या आठ दिवसाला पाणीपुरवठा होतो. हा पाणीपुरवठा दिवसाआड करावा या मागणीसाठी अँड. मनोज संकाये यांनी नगरपालिकेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे यांना मित्र मंडळाच्या वतीने निवेदन सादर केले असून त्यांनी शहरातील पाणीपुरवठा बाबत मुख्याधिकाऱ्यासमोर कैफियत मांडली. याप्रकरणी मी स्वतः दोन ते तीन दिवसांमध्ये योग्य ती कार्यवाही करून



प्रश्न निकाली काढण्यात येईल असे आश्वासन नगरपालिकेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे यांनी शिष्टमंडळास दिले.

सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सध्या नागापूर येथील वाण धरणात दोन वर्षे पुरेल एवढा पाणीसाठा आहे परंतु धरण उशाला आणि कोरड घशाला या म्हणी प्रमाणे शहरातील नागरिकांची बेहाल होत आहे. अनेक नागरिक पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करत आहे. वेळापत्रकानुसार नगरपालिका पाणीपुरवठा करत नाही त्यामुळे अनेक महिलांना पाणी सुटण्याची वाट पहावी लागते त्यामुळे त्यांचा रोजगार बुडतो तरीसुद्धा पाणी काही येत नाही अशी परिस्थिती शहरातील अनेक भागांमध्ये निर्माण झाली आहे.

हालगे गल्ली, मोंढा मार्केट, विद्यानगर, शारदानगर, पंचशील नगर माणिक नगर, न्यू माणिक नगर बजरंग नगर, समता नगर, आयोध्या नगर येथील नागरिक पाण्याची अक्षरशः देवाप्रमाणे वाट पाहत आहेत. परंतु पाणी काही दिवसात येत नाही सध्या पाणी आठ दिवसाला येते मात्र ते कधी येईल याचा नेम नाही. त्यामुळे अनेक महिला ज्या नोकरी करतात आणि रोजगार करतात त्यांचा रोजगार बुडत आहे परिणामी नागरिकांच्या आर्थिक नुकसान होत आहे. पाणीही अत्यंत गरजेचे बाब आहे. परंतु नगरपालिकेच्या ढिसाळ कारभारामुळे नागरिक आहेत. नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना याबाबतची त्यांनी माहिती दिली तसेच याबाबत योग्य ती कारवाई दोन ते तीन दिवसात करून दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन नगरपालिकेकडून देण्यात आले. यानंतर जर दिवसाआड पाणीपुरवठा शहरास झाला नाही तर नगरपालिकेसमोर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. यावेळी काशिनाथ सरवदे, अनिल चौधरी, संदीप चौधरी, प्रवीण रोडे, वैजनाथ केंद्रे, आनंद कातकडे, संतोष कांबळे, राजू कांदे, राम गडदे आदीसह मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. ***

# ‘आयुष्मान’ भारत मिशन समितीच्या अध्यक्षपदी ओमप्रकाश शेटे यांची निवड

बीड (बातमीदार):- बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र तथा गोरगरिबांचे देवदूत म्हणून परिचित असलेल्या डॉ.ओमप्रकाश शेटे यांना पदोन्नती मिळाली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीच्या अध्यक्षपदी निवड केली आहे. त्यांची निवड व कार्यकक्षा याबाबत सरकारच्या वतीने शासकीय परिपत्रक काढण्यात आले आहे. सरकारकडून झालेला हा सन्मान त्यांच्या कष्टाचे व परिश्रमाचे मूल्य अधोरेखित करणारा आहे. डॉ. शेटे यांच्याकडे आरोग्य क्षेत्रातील महत्वपूर्ण जबाबदारी आल्यामुळे सर्वसामान्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत विश्वासू म्हणून डॉ.ओमप्रकाश शेटे सबंध महाराष्ट्राला परिचित आहेत. फडणवीस यापूर्वी मुख्यमंत्री असताना डॉ. शेटे यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून केलेले काम उल्लेखनीयच नाही तर ऐतिहासिक आहे. तत्कालीन सरकारमध्ये फडणवीस यांचा 'सातवा माळा' गोरगरीब रुग्णांसाठी आरोग्य मंदिर बनला होता. त्या मंदिरातील पुजारी म्हणून शेटे यांनी केलेली रुग्ण सेवा अभूतपूर्व होती, याला महाराष्ट्र साक्षी आहे. त्यावेळी लाखो लोकांना योजनेचा लाभ देत मुख्यमंत्री सहायता निधीतून ६०० कोटी व धर्मादाय कोट्यातून एक हजार दोनशे कोटींचे उपचार करण्याचा विक्रम करण्यात आला होता. मात्र महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळामध्ये गरीब रुग्णांना उपचारासाठी मदत मिळणे दुरापास्त झाले होते.

राज्यामध्ये परत देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी आपल्या खास विश्वासू शिलेदारांना सोबत घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांचे निकटवर्तीय असलेल्या डॉ.ओमप्रकाश शेटे यांनाही पदोन्नती देण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाने फडणवीस यांच्या मान्यतेने प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व महात्मा फुले जनआरोग्य योजना




एकत्रिकरण करुन पाच लाख रुपयांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत नेण्याची जबाबदारी डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्यावर सोपवली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महत्वकांक्षी योजना म्हणून परिचित असलेल्या आयुष्मान भारत योजनेच्या महाराष्ट्राच्या अध्यक्षपदी डॉ. ओमप्रकाश शेटे यांची निवड करण्याचा महत्वपूर्ण निर्णय फडणवीसांनी घेतला आहे. त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

**डॉ.ओमप्रकाश शेटे सक्षम पर्याय–** विधान परिषदेच्या सभागृहात अधिवेशनामध्ये सत्ताधारी व विरोधक यांनी लक्षवेधी लावत आयुष्यमान भारत व महात्मा फुले जन आरोग्य योजना यातील त्रुटीवर प्रचंड टीका केली होती. या योजनेतील त्रुटीमुळे सामान्य माणसांना पाच लाख रुपयाचा लाभ मिळत नाही असा आरोप सर्वांनी केला होता. कदाचित या योजनेला शेवटच्या घटकापर्यंत देण्याकरिता व झारीतले शुक्राचार्य बाजूला करण्याकरिता डॉ.ओमप्रकाश शेटे सारखा अनुभवी व सक्षम पर्याय म्हणून फडणवीस यांनी त्यांच्यावर जबाबदारी सोपवली असल्याचे समजते. **रुग्ण व रुग्णालये दोन्ही वाचली पाहिजेत..!** प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना अशी एकत्रित असलेल्या आयुष्मान योजनेमध्ये राज्यातील १८०० पेक्षा जास्त रुग्णालये अंगिकृत आहेत. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी या हॉस्पिटलवर चाप बसण्याची गरज आहे. रुग्ण आणि रुग्णालये दोन्ही वाचली पाहिजेत यासाठी डॉ. ओमप्रकाश शेटे कसा सुवर्णमध्य साधतात? हे पहावे लागेल. जबाबदारी सोबतच मिळालेल्या अधिकारांचा वापर करून डॉ. शेटे हे सामान्य रुग्ण व रुग्णालये या दोघांमध्ये योग्य समन्वय साधतील यात शंका नाही. यासाठी यापूर्वीचा दांडगा अनुभव त्यांच्या कामी येईल. ***

# ‘रण फॉर परळी’ मॅरेथॉन मध्ये धावली तरुणाई

## परळीच्या पॉझिटिव्ह इमेज साठी ग्लोबल ट्रस्ट चा उपक्रम

परळी वैजनाथ, (प्रतिनिधी) : सामाजिक कार्यकर्ते मयांक गांधी यांच्या ग्लोबल ट्रस्टच्या वतीने आयोजित 'रन फॉर परळी' मॅरेथॉन स्पर्धा सिरसाळ्यात मोठ्या थाटात व तरुणाईच्या उत्साहात पार पडली. विशेषत ह्या स्पर्धेत प्रसिद्ध अभिनेते मिलिंद सोमन आपली पत्नी अंकीता सह सहभागी होत सिरसाळ्यातील रस्त्यावर धावले, परळी / सिरसाळ्यात प्रथमच एवढ्या भव्य मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मॅरेथॉन मध्ये सायकल, धावणे अशा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या, वेगवेगळ्या वयोगटातील तरुण – तरुणी सहभागी झाल्या होत्या. मिलिंद सोमण ह्या मॅरेथॉन चे आकर्षण असल्याने तरुण मध्ये अधिकच उत्साह निर्माण झाला . आरोग्य, फिटनेस चे मानवी जीवनात किती महत्व आहे हा संदेश ह्या मॅरेथॉन स्पर्धेतून दिला गेला . सकाळी ७ वाजल्यापासून स्पर्धेस अर्जुनेश्वर विद्यालया पासुन सुरवात झाली. या ठिकाणा पासुन ग्लोबल विकास ट्रस्ट च्या मुख्य संकुल पर्यंत पायी धावणे स्पर्धा होती . स्पर्धेत युवक युवती सोबत मिलिंद सोमण त्यांची पत्नी अंकित तसेच तहसीलदार व्यंकटेश मुंडे, माजी नायब तहसीलदार बाबुराव रुपनर सहभागी धावले , स्पर्धेची सांगता ग्लोबल विकास ट्रस्ट संकुल येथे तिरंगी ध्वजाचे ध्वजारोहण करुन विजेते स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक, रोख बक्षीस देऊन करण्यात आली . सदरील स्पर्धेस पोलीस प्रशासनाचे चोख ठेवला होता. पोलीस प्रशासनाच्या वतीने पीएसआय आनंद जाधव यांनी बंदोबस्त पाहिला तर गरज पडल्यास इमरजन्सी उपचारासाठी अॅम्बुलेन्स व डॉक्टरांचे पथक देखील नियोजित होते .

**मिलिंद सोमण यांचा 'पुश-अप सेल्फी' चॅलेंज !** मिलिंद सोमण यांच्या सोबत अनेकांनी सेल्फी फोटो घेण्यासाठी गर्दी केली होती परंतु सोमण यांनी नागरिकांना फिटनेसचा नवा फंडा दिला ''वीस पुश ( डिप्स ) करायचे आणि मगच सेल्फी घ्यायचा, उपस्थितांनी देखील प्रतिसाद देत पुश अप मारत सोमण यांच्या सोबत सेल्फी घेतली, या फॉर्मुल्या मुळे शेकडो युवक - युवतींना व्यायामाचे महत्व पटले आहे . मिलिंद सोमण यांच्या या 'पुश-अप सेल्फी' चॅलेंजला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिलाच परंतु या मुळे एक प्रकारे उत्साहात भर पडली .




**देशभरात परळीची इमेज पॉझिटिव्ह करायची आहे** : पत्रकारांशी बोलतांना ग्लोबल विकास ट्रस्ट चे सर्वा सर्वे मयांक गांधी बोलतांना म्हणाले कि, या ठिकाणी आम्ही शेती व शेतकऱ्यांसाठी काम करतोत,परंतु जेव्हा आम्ही बाहेर मुंबई, दिल्ली येथे जातोत तेव्हा तिथले लोक आम्हाला परळी /बीड बाबत निगेटिव्ह बोलतात, खून ,भ्रूण हत्या सारखे घटनांचा ते संदर्भ देतात परंतु आम्ही इथे काम करत असतांना जाणवते कि,परळी /बीडचे लोक चांगले आहेत. घडलेल्या घटना प्रसार माध्यमातून देशभरात जातात आणि या मुळे लोकांमध्ये परळी/बीड विषयी निगेटिव्हीटी तयार होते आहे.

परळीची निगेटिव्ह इमेज आम्हाला बदलायची आहे. देशभरात परळीची पॉझिटिव्ह ओळख निर्माण करायची आहे म्हणूनच आम्ही रण फॉर परळी मॅरेथॉन स्पर्धे घेतली आहे. एक चांगला संदेश या माध्यमातून पोहचणार आहे. असे मयांक गांधी म्हणले आहेत.

**आरोग्य जपले तरच प्रत्येक अडचणीला सामोरे जाता येते – सोमण :** तरुणांना व्यायामाचे महत्त्व सांगत असतांना मिलिंद सोमण म्हणाले कि,आरोग्य खुप महत्वाचे आहे,आरोग्य ठिक असेल तर आपण प्रत्येक अडचणींना तोंड देऊ शकतो,आरोग्य ठिक नसेल तर खुप अडचणींचा सामना करावा लागतो, स्वतासाठी वेळ दिला पाहिजे, शरीराची काळजी घेऊन शरीराची ताकत वाढवली पाहिजे असा संदेश अभिनेता मिलिंद सोमन यांनी दिला आहे.

* विजेते स्पर्धक मुले , ३ किमी : रोहित शिवाजी बिन्नार,अंकित मानसिंग इदोलिया,प्रणव दिलीप राठोड
* विजेते स्पर्धक मुली,३ किमी : दिव्या दत्ता राठोड,अंजली जितेंद्र पंडित, शिवकन्या मोहन चौरे
* विजेते स्पर्धक, मुले ५ किमी : चैतन्य मुकींदा रुपनर (सांगली),पाराजी बाबुराव गायकवाड (परभणी),जयश विलास पाटील (जळगाव)
* विजेते स्पर्धक, मुली ५ किमी : प्रणाली संजय शेगोकार ( शेगाव),अश्विनी मदन जाधव (सिरसाळा), गवते ज्योती शंकरराव (परभणी)
* सायकलिंग : नरेंद्र गंगाधर सोमवंशी (लातूर) तन्मय संतोष तिडके (बीड) , युवराज दिपक गिरी (सिरसाळा)

***

# बीड जिल्ह्यात ५६०८ प्रकरणे राष्ट्रीय लोकअदालतमध्ये निकाली

बीड (जिमाका) :- महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशावरून व श्री. आनंद एल. यावलकर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवार दि. २२ मार्च २०२५ रोजी पार पडलेल्या लोक न्यायालयात बीड जिल्हयातुन एकून ५६०८ प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली आहेत.

बीड जिल्हयातून न्यायालयातील प्रलंबीत प्रकरणांपैकी एकूण ११९२४ प्रकरणे ठेवण्यात आली होती. यामध्ये दिवाणी, फौजदारी, मोटार अपघात, भुसंपादनाची प्रकरणे, १३८ एन.आय.अॅक्टच्या प्रकरणांचा समावेश होता. त्यापैकी ६९३ प्रकरणे निकाली निघाली आहेत. तर दाखलपुर्व प्रकरणामध्ये एकूण ४४४८४ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ४९१५ प्रकरणे निकाली निघाली आहेत. असे एकूण ५६०८ प्रकरणे निकाली निघाली आहेत. यामध्ये १७ कोटी ३३ लाख ३३ हजार १५६ एवढ्या रकमेची प्रकरणे निकाली निघाली आहेत.

सदरील लोक न्यायालयाच्या प्रसंगी जी. जी. सोनी सदस्य सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्यासह, व्ही.एच.पाटवदकर साहेब, जिल्हा न्यायाधीश -२, श्रीमती एस.आर.शिंदे जिल्हा न्यायाधीश ३. के. आर. जोगळेकर, जिल्हा न्यायाधीश ४ तसेच इतर पॅनल प्रमुख, बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष आर.डी.येवले यांच्यासह वकील संघाचे सर्व पदाधिकारी जिल्हा सरकारी वकील व सर्व सरकारी अभियोक्ता यांची लोकन्यायालयात प्रमुख उपस्थिती होती. न्यायालयीन अधिकारी, कर्मचारी, विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी, बँक कर्मचारी, पोलीस कर्मचारी व इतर कार्यालयीन कर्मचारी यांनी लोकअदालत यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. **


**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग अंबाजोगाई**

**ई–निविदा सुचना क्रमांक–एबीजे/३५ सन २०२४–२०२५**

**शुद्धीपत्रक क्रमांक–४**

उपरोक्त निविदा सुचनेतील कामाच्या निविदा प्रक्रियेच्या कालावधीमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ई–निविदा उपलब्ध व स्विकृती अंतिम दिनांक | – | दि.०७/०४/२०२५ (वेळ १८.५५ वाजेपर्यंत) |
| २. | ई–निविदा उघडण्याचा दिनांक | – | दि.०९/०४/२०२५ (वेळ ११.०० वाजेपासुन पुढे) |

इतर तपशीला मध्ये कुठलाही बदल नाही.

टिप : १. वरील निविदा सुचने मध्ये ०१ काम आहे. व या निविदेप्रक्रियाची संपुर्ण माहिती खालील संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

**www.mahapwd.com**

**https:/mahatenders.gov.in**

स्वाक्षरीत/–

**कार्यकारी अभियंता,**

**सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई**

संपादकीय...

# नागरिकांचा दट्टा...!

**❊ सुविचार ❊**
**वास्तव स्वीकारले की, बरेच प्रश्न सुटतात.**

'काहीही करा, कसेही करा, कसेही वागा आपले काहीच होत नाही!' या धुंदीत, मस्तीत जगण्याची सवय आपल्याकडे अनेकांना लागली आहे. विशेष म्हणजे असे वागणाऱ्यांचे अनेकदा काहीच होत नाही असे दिसते. यामुळे संतप्त झालेला सर्वसामान्य माणूस आपला राग गट-गट गिळून शांत होतो. याची अनेक उदाहरणे पहायला मिळतात. येथे कायदा व सुव्यवस्था कुठे आहे? असा प्रश्न अनेकांना पडत असतो. परंतु कायदा व सुव्यवस्थेची अंमलबजावणी करणारे या सर्व बाबतीत दूर्लक्ष का करतात. डोळ्यावर पट्टी बांधून का वागतात. कायदा हातात घेणाऱ्या व मनमानी करणाऱ्यांवर कोणतीच कारवाई का करत नाहीत हा ही प्रश्न सर्वसामान्यांपुढे येथे असतो. ठराविक लोकांच्या अशा वागण्यांमुळे सर्वसामान्यांना मात्र बऱ्याचदा मोठा त्रास सहन करावा लागतो असे दिसते.

असाच एक प्रकार नुकताच परळी शहरात घडला. त्याचे असे झाले....शहरातील अरूणोदय मार्केट या नव्याने विकसित झालेल्या व्यापार पेठेत असलेल्या नगर पालिकेच्या ताब्यातील खुल्या जागेत (ओपन स्पेस) मध्ये येथीलच एका प्लॉट व्यवसायिकाने मनमानी करुन भव्य पत्र्याचे शेड उभारुन दुकान थाटले. अजूबाजूचे रहिवासी या बांधकामाबाबत आश्चर्य व्यक्त करु लागले. नगर पालिकेच्या मालकीच्या खुल्या जागेत (ओपन स्पेस) मध्ये असे अतिक्रमण कसे काय थाटले? हा प्रश्न सर्वसामान्यांना पडला. मोठी ओरड सुरू झाली परंतु असे कृत्य करणाऱ्याला काहीच वाटत नव्हते. लोक ओरडतील अन् गप्प बसतील असे त्याला वाटू लागले. असे वाटणे सहाजिकच होते. कारण 'परळीत काहीही करा काहीच होत नाही' याची आणि अशी सवय येथे अनेकांना आहे. त्यामुळे संबंधीत बांधकाम व्यवसायिक गप्प आणि बिनधास्त होता. परंतु या भागातील नागरिक गप्प बसले नाहीत ते संघटित झाले. त्यांनी 'ओपन स्पेस बचाव कृती समिती'ची स्थापना केली. सामाजिक कार्यकर्ते प्राचार्य मधुकर आघाव यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी लढा सुरु केला. परळी पालिकेला व इतर संबंधिताना याबाबत निवेदन दिले व अरुणोदय मार्केट परिसरातील खुल्या जागेतील अतिक्रमण काढण्याची मागणी केली. याकडे दूर्लक्ष झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला. पालिकेकडे निवेदन आल्यानंतर नेहमीप्रमाणे संबंधितांनी त्याकडे दूर्लक्ष व दिरंगाई केली. परंतु नागरिकांची एकजूट, त्यांचा लढा व आक्रमकता पाहून संबंधित अधिकाऱ्यांनाही नमते घेत या प्रकरणात लक्ष घालावे लागले. नगर रचनाकार व सीटीसर्व्हेच्या कार्यालयालाही संबंधितांनी ही बाब निदर्शनास आणून दिली. नागरिकांचा दट्टा व आक्रमकता तसेच एकूण परिस्थिती पाहून पालिका प्रशासनाने संबंधित अतिक्रमणाच्या विरोधात कारवाई करण्याचा निर्णय घेतला. संबंधित प्लॉट व्यवसायिकाला याबाबत तंबी दिली आणि या व्यवसायिकाने कायदा हातात घेऊन मनमानी करुन अरूणोदय मार्केट परिसरातील पालिकेच्या खुल्या जागेत (ओपन स्पेस) मध्ये थाटलेले भव्य पत्र्याच्या शेडचे दुकान किंवा अतिक्रमण काढून घेतले. सर्वसामान्य नागरिकांची एकजूट, संघर्ष यामुळे त्यांच्या लढ्याला मोठे यश आले. याची चर्चा परळीत सध्या जोरात सुरू आहे.

या घटनेनंतर असा प्रश्न पडतो की शहरात विविध भागात अशी बेकायदा अतिक्रमणे मोठ्या प्रमाणात वाढलेली आहेत. न्यायालयाने अतिक्रमणे हटवण्याबाबत निर्देशही दिलेले आहेत. परंतु परळी पालिका मात्र जुजबी मोहीम चालऊन थातूर-मातूर कारवाई करते. परंतु या अतिक्रमणाने शहरातील सर्वसामान्यांना होणारा त्रास व त्यांची गैरसोय, याकडे संबंधितांचे दूर्लक्ष होते. या विरुद्ध कडक व ठोस कारवाई का केली जात नाही हा प्रश्न येथे उपस्थित होतो आहे. बेकायदा अतिक्रमणे थाटली जाऊच नयेत म्हणून पालिका प्रशासन व इतर शासकीय यंत्रणा काहीही ठोस उपाय का करत नाहीत असा प्रश्न येथे सर्वसामान्य उपस्थित करतात. एकूणच परळी शहरातील विविध भागातील अतिक्रमणाबाबत संबंधित प्रशासनाने अरुणोदय मार्केट प्रमाणेच ठोस भूमिका घ्यायला हवी अशी लोकभावना येथे आहे. ❊❊❊❊

# गुढीपाडवा : स्वागत नववर्षाचे...

गुढीपाडवा हा सण महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा सण आहे. महाराष्ट्राच्या नववर्षाची सुरूवात गुढीपाडव्यापासून होते. हिंदू कालदर्शिकेप्रमाणे चैत्र शुद्ध प्रतिपदेला म्हणजेच वसंत ऋतूच्या पहिल्या दिवसाला गुढीपाडवा साजरा केला जातो. या वर्षी ३० मार्च २०२५ ला महाराष्ट्रात गुढीपाडवा साजरा केला जाणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात मराठी नवीन वर्षाचं स्वागत केलं जातं. पारंपरिक वेषभूषा करून, घरोघरी गुढी उभारून, गोडाधोडाचा स्वयंपाक करून, सार्वजनिक ठिकाणी गुढीपाडवा निमित्त रांगोळ्या, देखावे, शोभायात्रा काढून, एकमेकांना गुढीपाडव्याच्या शुभेच्छा देतात आणि मराठी नववर्षाचं स्वागत केलं जातं. यासाठीच जाणून घ्या गुढीपाडवा माहिती..

**गुढीपाडवा इतिहास :-**

गुढीपाडवा साजरा करण्यामागे अनेक पौराणिक कथा (गुढीपाडवा इतिहास) सांगितल्या जातात. असं म्हणतात की, महाभारताच्या आदिपर्वात उपरिचर राजाने इंद्राने त्याला दिलेली कळकाची काठी जमिनीत रोवली आणि नवीन वर्षाच्या सुरूवाताला तिची पुजा केली. या परंपरेचा आदर राखण्यासाठी गुढी पुजन केले जाऊ लागले. इतिहासात या दिवशी ब्रम्हदेवाने विश्व निर्मिती केली असं वेदात म्हटल्याचा उल्लेख आहे. पौराणिक कथेनुसार श्रीराम वनवासातून पुन्हा अयोध्येला परत आले म्हणून गुढीपाडवा साजरा केला जातो. म्हणूनच यशाची गुढी उभारून हा दिवस साजरा केला जातो. गुढीपाडवा का साजरा करतात यामागे अनेक कथा सांगितल्या जातात. एका कथेनुसार पार्वती आणि शंकराचे लग्न पाडव्याला ठरलं आणि तृतीयेला झालं होतं. म्हणूनच या दिवशी आदिशक्ती पार्वतीची पुजा केली जाते.



**गुढीपाडव्याचे महत्त्व:-** गुढीपाडवा हा सण साजरा करण्यामागे पौराणिक कथेत अनेक संदर्भ सापडत असले तरी आजही हा सण तितक्याच उत्साहात साजरा केला जातो. आजच्या आधूनिक युगातही या सणाला ऐतिहासिक सांस्कृतिक आणि नैसर्गिकदृष्ट्या विशेष महत्त्व आहे. म्हणूनच पुढच्या पिढीसाठी गुडी पाडवा महत्व जाणून घेणं फार गरजेचं आहे. वास्तविक प्रत्येक सण साजरा करण्यामागे पुर्वजांचे काही उद्देश असतात. चैत्र महिन्यापासून वसंत ऋतूच्या आगमनाला सुरूवात होते. त्यामुळे वातावरणात बदल झालेले असतात. जुनी सुकलेली पानं गळून झाडांना नवी पालवी फुटते, आंब्याला मोहोर येतो याचं प्रतिक म्हणून गुढीला आंब्याची डहाळी बांधली जातात. पूर्वीपासून या नैसर्गिक बदलाचे स्वागत करण्याची पद्धत असावी. नवीन वर्षाच्या स्वागतामध्ये काही गोष्टी महत्त्वाच्या आहेत. वातावरणात वाढलेल्या उन्हाची काहिली कमी करण्यासाठी गुढीमध्ये कडूलिंबाची पाने लावली जातो. प्राचीन काळापासून चैत्र शुद्ध प्रतिपदेला ओवा, मीठ, हिंग, मिरी आणि साखर हे कडुनिंबाच्या पानांबरोबर वाटून खातात. यामुळे पचनक्रिया सुधारणं, पित्ताचा नाश करणं, त्वचारोग बरं करणं, धान्यातील किड थांबवणं हे सर्व यामुळे शक्य होतं. कडुनिंबामध्ये अनेक गुण असल्यामुळे आयुर्वेदातही याला खूप महत्त्व आहे. शरीराला थंडावा देणारी कडुनिंबाची पानं आंघोळीच्या पाण्यात घालून आंघोळही केली जाते. ती वाटून खाल्ल्यामुळे आरोग्याला चांगला लाभ होतो. गुढीपाडव्याचा सण साजरा करण्यासाठी केल्या जाणाऱ्या या अशा अनेक गोष्टींना विशेष महत्त्व असतं. मात्र त्यासाठी प्रत्येकाला गुढीपाडवा माहिती माहीत असायला हवी.

**१. गुढीपाडव्याच्या दिवशी घरोघरी गुढी उभारली जाते:-** काही जणांना विशेषतः नव्या पिढीला गुढी कशी उभारावी माहिती कमी असलेली दिसून येते. नववर्षाचे स्वागत करण्यासाठी घरोघरी गुढी उभारण्याचा कार्यक्रम केला जातो. यासाठी घरातील सर्वजण लवकर उठून गुढी उभारण्याची तयारी करतात. एक उंच बांबूच्या काठीला धुवून स्वच्छ केले जाते. त्याला रेशमी साडी अथवा वस्त्र नेसवून त्यावर चांदीचा अथवा तांब्याचा तांब्या, कडूलिंब, आंब्याची पाने, साखरेची माळ, फुलांचा हार बांधून तिला सजवले जाते. घराच्या दारात अथवा खिडकीत गुढी उभारण्यात येते. गुढी हे स्नेहाचे, मांगल्याचे, उत्साहाचे आणि आनंदाचे प्रतिक मानले जाते. ज्यामधून विजयपताका उभाल्याचा आनंद व्यक्त होत असतो. घराबाहेर रांगोळी काढली जाते.

**गुढीपाडव्याला करतात पारंपरिक वेशभूषा:-** गुढीपाडवा हा महाराष्ट्राचा महत्त्वाचा सण आहे. शिवाय या दिवसापासून मराठी नवीन वर्षाला सुरूवात होते. सहाजिकच या नवीन वर्षाचे स्वागत पारंपरिक वेशभूषेने केले जाते. महिला गुढीपाडव्याच्या दिवशी वेगवेगळ्या प्रकारचे साडी लूक्स परिधान केलेल्या दिसतात. . महिला या दिवशी खास नऊवारी साडी, नथ, ठुशी असे पारंपरिक दागदागिने घालतात तर पुरुषमंडळी धोती, सलवार, कुर्ता असा पारंपरिक पेहराव करतात.

**गुढीपाडव्यानिमित्त शोभायात्रा काढली जाते:-** महाराष्ट्रात सार्वजनिक ठिकाणीदेखील गुढीपाडवा मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. रस्त्यावर चौकाचौकात मोठमोठया रांगोळ्या काढल्या जातात, पारंपरिक वेशभूषा केली जाते, लोझिम, ढोल ताशे आणि भव्यदिव्य देखावे करून मोठी शोभायात्रा काढली जाते. शहरातील सर्व समाजातील लोक यात सहभाग घेतात आणि मराठी नवीन वर्षाचे स्वागत करतात.

हिंदू धर्मातील कोणत्याही सणाचे स्वतःचे महत्त्व असते आणि ते लोकांना नीट समजून घेणे आवश्यक असते. इंग्रजी सभ्यतेच्या जाळ्यात अडकून कुठेतरी आपण आपली प्राचीन व पुरुषी संस्कृती विसरत चाललो आहोत. हा लेख सादर करण्यामागचा आमचा उद्देश आपल्या सर्वांना आपल्या प्राचीन सणांची आणि पवित्र प्रसंगांची जाणीव करून देणे हा होता. आपला हिंदू धर्म आणि आपली भारतीय सांस्कृतिक सभ्यता आपण नेहमी विसरता कामा नये.

**गुढीपाडवा पूजा विधी :-**

शालिवाहन नावाच्या कुंभाराच्या मुलाने मातीचे सैन्य तयार केले आणि त्यावर पाणी शिंपडले, त्यांना जीवन दिले आणि प्रबळ शत्रूचा पराभव केला. त्याच्या विजयाच्या अपेक्षेने शालिवाहन शक सुरू झाला. त्याच दिवशी या कथेचा मथितार्थ असा की, त्यावेळी संपूर्ण हिंदू समाज बेहोश झाला होता. गुलामगिरी इतकी मादक बनली होती की ती भूतकाळाची गोष्ट बनली होती. समाजात क्षेत्रतेज संपले होते. शालिवाहनने आपल्या सामर्थ्याचा विसर पडलेल्या समाजात आत्मविश्वास आणि सशक्तीकरण निर्माण केले. त्याच दिवशी रामाने बळीचा पराभव करून दक्षिणेतील लोकांना शांत केले. यावेळी सर्वांनी ध्वजारोहण करून आनंद साजरा केला. असेही मानले जाते की लंका जिंकून श्रीराम अयोध्येला परतले तेव्हा लोकांनी ध्वजारोहण करून त्यांचे मोठ्या उत्साहात स्वागत केले. गुढीपाडवा हा खास महाराष्ट्रीयन पदार्थांसाठीही ओळखला जातो. पंगती फूड देखील या दिवशी कुटुंब किंवा मित्रांसोबत अतिशय खास साग्रसंगीत पद्धतीत शैलीत दिले जाते. महाराष्ट्रीयन थाळी म्हटलं की मनात येणारे पदार्थ म्हणजे श्रीखंडपुरी, खीरपुरी, बासुंदीपुरी, भाजीपुरी, पुरणपोळी, मसालाभात, कोशिंबीर, चटण्या, लोणचे, पापड, सीताफळ किंवा आलू वड्या, बत्तावडे किंवा भजी. या महाराष्ट्रीयन डिशमध्ये सर्व प्रकारचे स्वाद आणि रंग आहेत. जणू काही खाद्यपदार्थ आपल्या चव आणि रंगाने नवीन वर्षाचे स्वागत करत आहेत. त्यामुळे यंदा गुढीपाडवा साजरा करण्यासाठी काही खास महाराष्ट्रीयन खाद्यपदार्थ घरीच तयार केले पाहिजेत.
(संग्रहित)

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com
❊ वर्ष ०८ ❊ अंक ४९ ❊ पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) बुधवार, दि. २६ मार्च २०२५ ❊ किंमत : २ रू.

# आरएनआय कडून ९९ हजार वृत्तपत्रांवर बंदी
## ‘व्हॉईस ऑफ मीडिया’ने व्यक्त केली तीव्र नाराजी

नवी दिल्ली (वृत्तसंस्था):- रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स फॉर इंडिया (RNI) कार्यालयाने देशभरातील ९९,१७३ नोंदणीकृत स्थानिक वृत्तपत्रे आणि नियतकालिकांना ‘DE-FUNCT’ (निष्क्रिय) यादीत टाकले असून या निर्णयाने संपूर्ण माध्यम क्षेत्रात खळबळ उडाली आहे. ही कारवाई त्या वृत्तपत्रांवर करण्यात आली आहे, ज्यांनी गेल्या पाच वर्षांत वार्षिक विवरणपत्र (Annual Statement) ऑनलाईन स्वरूपात सादर केलेले नाही. या निर्णयामुळे लघु, ग्रामीण व स्थानिक पातळीवर कार्यरत असलेल्या माध्यम संस्थांना मोठा फटका बसला आहे. अनेक संपादक, पत्रकार, मुद्रक आणि प्रकाशक संकटात सापडले असून, त्यांचे भविष्य धोक्यात आले आहे. ‘व्हॉईस ऑफ मीडिया’ पत्रकार संघटनांनी या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त करत, त्यामागे स्थानिक पत्रकारांचा आवाज बंद करण्याचा हेतू असल्याचा आरोप केला आहे.

या पार्श्वभूमीवर, ‘व्हॉईस ऑफ मीडिया’ या देशव्यापी पत्रकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून आपला निषेध नोंदवला आहे. पत्रात त्यांनी म्हटले आहे की, हा निर्णय म्हणजे स्थानिक पत्रकारांचा आवाज गप्प करण्याचा प्रयत्न आहे. प्रशासनातील त्रुटी, भ्रष्टाचार, आणि जनतेच्या समस्या मांडणाऱ्या छोट्या माध्यम संस्थांवर अप्रत्यक्ष बंदी घालण्यात आली आहे.

संदीप काळे यांनी स्पष्ट सांगितले की, अनेक वृत्तपत्रांनी Republication साठी अर्ज केले असूनही, प्रेस रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया (PRGI) कार्यालयाकडून त्यांना तांत्रिक कारणांवरून सातत्याने नकार दिला जात आहे. हा प्रकार थेट माध्यम स्वातंत्र्यावर गदा आणणारा असून, ही कारवाई तात्काळ मागे घेण्यात यावी, अशी त्यांनी मागणी केली आहे.

‘व्हॉईस ऑफ मीडिया’ने यासंदर्भात देशभरात व्यापक आंदोलन छेडण्याची तयारी सुरू केली आहे. अनेक राज्यांतील पत्रकार संघटना आणि संपादक या आंदोलनात सहभागी होण्याच्या तयारीत असून, जर लवकरच RNI ने आपली भूमिका बदलली नाही, तर दिल्लीतील केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयासमोर शांततापूर्ण आंदोलन, निदर्शने किंवा धरणे आयोजित केली जाऊ शकतात, असा इशारा संघटनेने दिला आहे.

संदीप काळे म्हणाले, स्थानिक व लघु वृत्तपत्रे बंद झाली, तर लोकशाहीतील चौथा स्तंभ कमकुवत होईल. गावपातळीवर, तालुक्यात, जिल्ह्यात लोकांचे प्रश्न कोण मांडणार? म्हणूनच अशा प्रकारची थेट बंदी हे गंभीर संकट आहे.

# ऊस तोडणीसाठी ८ कोयते देतो म्हणून मुकादामाची केली दीड लाख रुपयाची फसवणूक
## सिरसाळा पोलीस ठाण्यात तिघाविरुद्ध गुन्हा दाखल

परळी वैजनाथ, (बातमीदार):- ऊस तोडणीसाठी आठ कोयते देतो म्हणून एका मुकादम कडून दीड लाख रुपये उचल घेतली. परंतु मुकादम सोबत झालेल्या करारानुसार कोयते दिले नाहीत. सदरील मुकादमाने उचल परत मागितली असता आम्ही पैसे देणार नाहीत तुला काय करायचे ते कर असे म्हणत धमकी दिली. याप्रकरणी सिरसाळा पोलीस ठाण्यात तीन आरोपी विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सिरसाळा पोलीस सूत्राकडून प्राप्त माहिती अशी की, संजय साहेबराव शिंदे व्यवसाय शेती व मुकादम रा. जयगाव ता. परळी जिल्हा बीड यांच्याकडून आरोपी शेख साबाजी हिराजी, शेख फिरोज साबाजी, शेख अनवर साबाजी सर्व रा. जयगाव तालुका परळी यांनी ऊस तोडणी साठी आठ कोयते देतो असे म्हणुन त्याच्या कडुन १५,००००/- रू. उचल घेतली. आरोपींनी तोंडीव लेखी करारानुसार ऊस तोडनिसाठी ०८ कोयते दिले नाहीत. आरोपीतांना पैसे परत मागीतले असता आम्ही तुझे पैसे देणार नाहीत तुली कायकरायचे ते कर असे म्हणुन धमकी देवुन अर्थीक फसवणूक केल्याची घटना दि. ५ जुलै २०२३ ते ९ नोव्हेंबर २०२३ रोजी च्या दरम्यान सदरील घटना घडली आहे. याप्रकरणी मुकादम संजय साहेबराव शिंदे यांच्या फिर्यादीवरून सदरील आरोपी विरुद्ध सिरसाळा ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ७५/ २०२३ कलम ४२०, ४०६, ३४ भादविनुसार दि.२३ मार्च २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार देशमुख हे करीत आहे. ***

# औरंगजेबासंदर्भात समाज माध्यमांवर आक्षेपार्ह पोस्ट; अल्पवयीन दोघांविरुद्ध कारवाई

परळी वैजनाथ, (बातमीदार):- औरंगजेबा संदर्भात समाज माध्यमांवर आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या अल्पवयीन दोघांविरुद्ध कारवाई परळी शहर पोलीसांनी कायदेशीर कारवाई केली आहे.या घटनेने एकच खळबळ उडाली आहे.

दोन समाजात द्वेष भावना वाढवण्याच्या उद्देशाने २ अल्पवयीन इसमांनी इंस्टाग्राम वर दि. २२/३/२०२५ रोजी रात्री ९ वाजेच्या दरम्यान औरंगजेब संदर्भाने आक्षेपार्ह पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल केली. सायबर पोलीस सोशल मीडियावर लक्ष ठेवून असल्याने ही पोस्ट दिसून आली. तसेच सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर ही पोस्ट व्हायरल होत असल्याचे निदर्शनास आले. सायबर पोलीस कडील उपलब्ध व्हायरल पोस्टवरून पोलीस ठाणे परळी शहर येथे गोपनीय शाखेचे पो का.विष्णू फड यांच्या फिर्यादवरून गुरन ६१/ २०२५ कलम ३५३ ( २) भारतीय न्याय संहिता प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही पोस्ट समाज मध्यमावरून हटविण्यात आली आहे. ***

# क्रांती सूर्य : संत तुकोबाराय

नामदेवे केले सप्नामाजी जागे ।
सवे पांडुरंग येवोनिया ।।
सांगितले काम करावे कवित्व ।
वाऊगे निमित्त बोलू नये ।।

हा संत तुकारामांचा अभंग वारकरी संप्रदायाच्या विचारधारेनुसार आहे. ज्या संत नामदेवानी भागवत धर्म मंदिराचा पाया रचला त्याचा कळस संत तुकोबाराय झाले. त्या काळी वर्णव्यवस्थेने आपली पाळेमुळे घट्ट रोवलेली होती. देव-धर्माच्या नावाखाली समान्यांची प्रचंड लुट चालू होती. परकीयांच्या टाचेखाली चिरडला जाणारा माणूस, मुजरा करण्यात ध्यनता मानता होता. अस्मानी सोबत सुलतानी आणि आर्थिकते सोबत आत्मिक कुचंबानांनी सीमा ओलांडल्या होत्या.

चोहोबाजुंनी अंधारलेल्या सतराव्या शतकात वारकरी संप्रदायाच्या कळसाचा जन्म झाला. तुकाराम बोल्होबा अंबिले नावाच्या क्रांतीसूर्याचा जन्म पुण्याजवळ देहू या गावात १६०८ मध्ये झाला. त्यांचा जीवनकाळ इ.स.१६०८ ते इ.स.१६५० असा होता. आपल्या अभंगाच्या माध्यमातून संत तुकोबारायांनी कोणती क्रांती केली ?

खळांची सिंहासने गदा गदा हलवली संतत्वाची कसोटी स्वत:ला लावली. संसार करण्याची धमक केवळ स्वत:चा व्यक्तिगत संसार करण्यासाठी वापरण्याऐवजी समाजाच्या, राष्ट्राच्या एका व्यापक विशाल जनसमुहाच्या संसारासाठी वापरण्याचे व्रत घेतले. वेदाच्या अंकीत नसल्याची घोषणा केली. पंडितांच्या सिंहासनाला हादरे दिले. पवित्र वृत्तीने, विचाराने, आचाराने घेत नसलेले ब्रम्हज्ञान तुच्छ मानले.

**विज्ञान आणि प्रयत्नवादाचे पुरस्कर्ते संत तुकोबाराय :** संत तुकोबारायांनी आपल्या भजन - किर्तनाच्या माध्यमातून दिशाहीन देवा - धर्माचे खुळ कधीच माजविले नाही. तर लोकमानस विज्ञाननिष्ठ बनविण्याचा प्रयत्न केला. प्रयत्नवाद हा बहुजण विचारधारेचा अविभाज्य घटक आहे. तर दैववाद, चमत्कारवाद ही काल्पनिक विचारधारा आहे. इतिहासात प्रयत्नवादाचे खंदे पुरस्कर्ते चार्वाक-बुध्द आहेत. चार्वाक - बुध्दांची ही परंपरा, विचारधारा विठ्ठलोपासक वारकरी संत चालविताना प्रयत्नवादा बरोबर अहिंसा, दया, करुणा मैत्रीचा संदेश संत साहित्यातून बहुजन समाजाला दिला जातो.

**संत तुकारामांचे काही अभंग**

१) दया तिचे नांव, भुतांचे पालन ।
आणिक निर्दालन कंटकाचे ।।
२) सदा सर्वकाळ अंतरी कुटील ।
त्यांन गळा माळ घालु नये ।।
३) ओले मुळ भेदे खडकाचे अंग ।
अभ्यासाति सांग कार्य सिद्धी ।।
४) तुका म्हणे आम्ही विधीचे जनिते ।
स्वयंभु आयते नोव्हे केले ।।
५) मढे झाकोनिया, करिती पेरणी ।
६) कलयुगामाजी, संत झाले फार ।
वितभर पोटासाठी, फिरती दारोदार ।।
७) नाही निर्मळ जीवन ।
काय करील साबन ।।
८) जोडोनिया धन, उत्तम व्यवहारे ।
उदास विचारे, वेच करे ।।
९) तीर्थी धोंडा पाणी ।
देव रोकडा सज्जनी ।।
१०) नवसे कन्यापुत्र होती ।
तरी का करणे लागे पती ।।
११) भुके नाही अन्न ।
मेल्यावरी पिंडदान ।।

संत तुकोबारायांनी आशा प्रकारच्या अनेक अभंगाच्या माध्यमातून, किर्तन - भजनातून प्रचंड प्रमाणात लोक प्रबोधन केले. कोणतीही देव - देवता आपले कार्य करायलाही येत नाही आणि बिघडायलाही येत नाही. जगात कोणताही चमत्कार नाही. कोणतीही देव - देवता कोणाच्याही अंगात येत नाही आणि कोणताही चमत्कार करत नाही. मेल्यावर कोणतेही कर्मकांड करण्यापेक्षा जीवंत असताना सहकार्य, सेवा, काळजी घेणे महत्वाचे असते. आपणच आपल्या भाग्याचे शिल्पकार आहोत याचे नेहमी प्रत्येकानी भान ठेवले पाहिजे. काया, वाचा, मनाने केलेले कार्य पुर्णत्वास जात असते याची जाणीव असावी. अनेक अभंगातून संत तुकोबारायांनी शेतकरी, कष्टकरी तसेच सामान्य जनांना जीवन सुखी - समाधानी होण्यासाठी यथायोग्य, सुलभ



असे मार्गदर्शन केले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज अकरा - बारा वर्षाचे असताना जिजाऊ - शिवरायांनी संत तुकाबोरायांच्या अनेक भेटी घेतल्या. अनेकवेळा मार्गदर्शन घेतले. यामध्ये संत तुकोबारायांचा शिवसंदेश हा होता.

शिव तुझे नाव ठेविले पवित्र ख
छत्रपती सुत्र विश्वाचे खख

शिवरायांना छत्रपती बिरुदावली प्रथम संत तुकोबारायांनी वापरली. पुढे स्वराज्य स्थापनेसाठी आपल्या अभंगाच्या प्रबोधनाच्या माध्यमातून वारकरी आणि स्वराज्याचे धारकरी निर्माण केले. संत तुकोबारायांचे (पाईकीचे) अभंग तर सरळ - सरळ राजकीय प्रकट चिंतनच होय की ज्याचे छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या प्रशासन व्यवस्थेत अनुकरण केले. गनिमी कावा म्हणजे शिव-निती चा सिध्दांत जातिवंत (पाईकाची) सैनिकाची आवश्यकता व त्यांची निवड स्पष्टपणे मांडली तुकोबांचा हा राजकीय उपदेश छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजकारणास प्रेरक ठरला मानवता धर्माधिष्ठीत राज्य हे तुकोबारायांचे स्वप्न होते की जे पुढे शिवशाहीच्या रुपाने साकार झाले.

शेतकऱ्यांची कर्जमुक्ती :

वयाच्या विशित असलेल्या संत तुकोबांना भांबनाथाच्या डोंगरावर आत्मचिंतनातून साक्षात्कार झाला, हे खरे आहे हा साक्षात्कार सामाजिक न्यायाच्या स्वरुपात होता. यानंतर वडिलांनी लोकांना दिलेली कर्जाची कागदपत्रे इंद्रायणी डोहात बुडवली. हे कृत्य संसाराला विटल्यामुळे नव्हे, तर संसाराला चिकटणारा शोषणाचा घटक छाटून टाकण्यासाठी केले. अशाप्रकारे संत तुकोबांनी शेतकरी, कष्टकऱ्यांची कर्जमुक्ती केली. संत तुकोबाराय त्या परिसरातील श्रीमंत कुटूंबातील होते हे सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे.

संत तुकोबाराय यज्ञ, श्राध्द, पुजा, भविष्यकथन, शुभाशुभ, नवस, गुहेतील ज्ञान, संन्यास, मोक्ष यांचे परंपरागत स्वरुप नाकारुन त्यांच्यापेक्षा शुद्धआचार, विचाराला महत्व दिले.

गुरु - शिष्य परंपरा नाकारली. समाजव्यवस्थेला न्यायाचे, आचार, विचाराचे, मानवतेचे अधिष्ठान देण्यासाठी रात्रंदिवस युध्द केले.

**‘विठोबा’ चा अर्थ काय ?**

वि चा केला ठोबा ज्ञान, विचार, आचाराचे, मानवतेचे सर्वोच्च प्रतिक म्हणजे विठोबा होय ही संत तुकोबांची विठोबांची म्हणजे देवाची व्याख्या होती. त्यांनी मेसाई, जोखाई, खंडोबा इ. च्या प्रतिमा झिडकारल्या नाहीत तर व्यवस्थेने विकृत केलेल्या त्यांच्या प्रतिमा झिडकारल्या, माणसाला गुलाम करणारी व्यवस्था नाकारली. देव कुठे आहे ? कशात आहे ? आणि कसा भेटेल ? हे संत तुकोबारायांनी आपल्याला सांगितले. देवाविषयी असणारे गैरसमज म्हणजे कोपनारा देव म्हणून असणारी भिती, त्याच्या प्राप्तीसाठी स्वत:ला दुर्बल मानुन करावी लागणारी भक्ती त्यासाठी अट्टाहास दलालांची दलाली, कर्मकांड इत्यादी सर्व गोष्टी झिडकारल्या.

संत तुकोबारायांचे वैकुंठ गमण :

संत तुकोबारांयाचे वैकुंठ गमण हि एक मनुवाद्यांची थापच आहे. सदेह वैकुंठ गमण आजच्या विज्ञानाच्या कसोटीवर आजीबात टिकत नाही. संत तुकोबारायांनी जी मनुवादी व्यवस्था बदलण्यासाठी जिवाच्या आकांताने लढाई केली, त्या मनुवादी व्यवस्थेतच त्यांच्या मृत्यूची बीजे होती. अशाप्रकारे संत तुकोबांनी आपल्या अनेक अभंगाच्या माध्यमातून किर्तन, प्रवचनातून, लोकप्रबोदनातून प्रचंड मोठी क्रांती केली. त्या मनुवादी व्यवस्थेतच त्यांच्या मृत्यूची बीजे होती. अशाप्रकारे संत तुकोबांनी आपल्या अनेक अभंगाच्या माध्यतातून, किर्तन, प्रवचनातून, लोकप्रबोधनातून प्रचंड मोठी क्रांती केली. लोकांच्या मनातील, आचरणातील अंधश्धदेची, कर्मकांडाची जळमटे काढून टाकली. हे कार्य संत तुकोबांनी अखंडपणे तळपत्या सुर्याप्रमाणे केले. या कार्याची अमर गाथा. भुत - वर्तमान आणि भविष्याची शिल्पकार ठरली आहे.

**समारोप :**

वारकरी धर्माचा पाया संत नामदेवांनी घातला तर त्यावर कळस संत तुकोबांनी चढवला, या कार्याचा वसा आणि वारसा अनेक वारकरी, किर्तनकार, प्रवचनकार, मराठा सेवा संघ, बामसेफ सारख्या बहुजन विचारांच्या संघटना चालवतात. ज्या महामानवांनी, संतानी विचारवंतानी बहुजनांच्या कल्याणासाठी कार्य केले. त्यांना मनुवाद्यांनी अनेक प्रकारचा त्रास दिला आणि त्यांना संपवले. यापुढे या कार्याचा वसा आणि वारसा चालवणाऱ्या संघटनांनी महामानवांच्या, संताच्या विचारांच्या होणाऱ्या कत्तली रोखायच्या आहेत. मानवता धर्माचे संरक्षण म्हणजे लोकशाही चे जतन करायचे आहे.

माता - भगिणीने कोणत्याही ढोंगी बुवा बापु - खिसेकापुच्या पाठीमागे न धावता संतांचे, महामानवांचे कार्य समजुन घेऊन आपल्या मुला-मुलींना भरपूर शिक्षण दयावे, सुसंस्कारीत करावे. उपास - तापास न करता स्वत:च्या आणि आपल्या कुटूंबाच्या आरोग्याची काळजी घ्यावी. आत्महत्या मुक्त शेतकरी, दंगलमुक्त गाव, व्यसनमुक्त तरुण, कोरोना सारख्या महामारी मुक्त भारत, जागतीक दर्जाचा सुज्ञ समाज निर्मितीसाठी क्रांतीसुर्य, संतश्रेष्ठ जगतगुरु संत तुकाराम महाराज यांच्या उदात्त अशा कार्याला त्रिवार अभिवादन.

***असाध्य ते साध्य, करीता सायास ।***
***कारण अभ्यास, तुका म्हणे ।।***
जय जिजाऊ, जय शिवराय।।
जय ज्योती, जय भिमराय।।
जय जगतगुरु, संत तुकोबाराय।।

**- रामकिसन गुंडिबा मस्के**
अंबाजोगाई